

मुख्यमंत्र्यांची दिवाळी शेतकऱ्यांसोबत!

देवेंद्र फडणवीस नागपूरच्या लोहारी सावंगा गावात साजरा करणार सण, गावातच मुक्काम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



नागपूर – देशभरात दिवाळीचा मोठा उत्साह बघायला मिळत आहे. मात्र यंदा राज्यात ओढवलेल्या तीव्र दुष्काळाच्या सावटाने बळीराजा काहीसा अडचणीत आला आहे. या पार्श्वभूमीवर सरकारस्थरावरून प्रयत्न करतांनाचं दिसत आहे.

अशातच आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज शेतकऱ्यांसोबत दिवाळी साजरी करणार आहे. नागपूर जिल्ह्यातील नरखेड तालुक्यात लोहारी सावंगा येथील शेतकऱ्यांसोबत मुख्यमंत्री आज रात्री दिवाळी साजरी करणार आहे.

शेतकऱ्यांवर ओढवलेल्या संकटाच्या काळात सरकार बळीराज्याच्या पाठीशी आहे, असा धीर देण्याचं काम या निमित्याने केलं जाणार असल्याचं बोललं जात आहे.

त्यासाठी मुख्यमंत्री आज नागपूरहून संध्याकाळी लोहारी सावंग्याकडे रवाना होतील अशी माहिती आहे. परतीच्या प्रवासात काही गावांमध्ये थांबून शेतीची पाहणी तसेच जलसंधारण कामांचा आढावा दरम्यान, या कार्यक्रमात रात्री शेतकऱ्यांसोबत संवाद साधून शेतीविषयक समस्या, सिंचन, पीक विमा आणि इतर स्थानिक प्रश्नांवर मुख्यमंत्री चर्चा ही करतील.

रात्री त्यांचा त्याच गावातच मुक्काम राहील. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांचं मनोबल वाढवावं, त्यांना धीर मिळावं आणि त्यांच्या सुख-दुःखात शासन त्यांच्या सोबत आहे ही भावना वाढावी, या दृष्टीने मुख्यमंत्री शेतकऱ्यांसोबत दिवाळीला त्यांच्यासोबत असणार आहे.

त्यानंतर उद्या सकाळी (रविवारी) नरखेड तालुक्यातील लोकप्रतिनिधींसोबत ते बैठक करतील, अशी माहिती आहे. परतीच्या प्रवासात काही गावांमध्ये थांबून शेतीची पाहणी तसेच जलसंधारण कामांचा आढावा ही ते घेतील अशी देखील माहिती आहे.

माकडाने हिसकावलेली बॅग परत मिळवणे ठरले जीवघेणे

नागपुरातील शिक्षकाचा मध्यप्रदेशातील पचमढीच्या दरीत कोसळून दुर्दैवी मृत्यू

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



पचमढी – मध्य प्रदेशातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ पचमढी येथे पर्यटनासाठी गेलेल्या नागपूरच्या एका शिक्षकाचा खोल दरीत पडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी घडलीय.

विजय नाईक असे ४० वर्षीय मृत शिक्षकाचे नाव असून ते नागपुरातील रामदासपेठ येथील सोमलवार शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत होते. पचमढीच्या प्रियदर्शनी पॉइंटवर फिरत असताना माकडाने त्यांची बॅग हिसकावली. ती परत मिळवण्याच्या प्रयत्नात त्यांचा तोल गेला आणि ते खोल दरीत कोसळले. त्यातच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झालाय. मिळालेल्या माहितीनुसार, विजय नाईक हे पर्यटकांच्या एका गटासह गुरुवारी सायंकाळी नागपूरहून पचमढी येथे पोहोचले होते. शुक्रवारी सकाळी हा गट प्रियदर्शनी पॉइंट येथे फिरण्यासाठी गेला होता. तेथे निसर्गसौंदर्याचा आनंद घेत असताना फोटो काढण्याच्या वेळी एका माकडाने विजय यांची बॅग हिसकावली. बॅग परत मिळवण्यासाठी त्यांनी माकडाच्या दिशेने धावून जाण्याचा प्रयत्न केला.

मात्र, याचवेळी त्यांचा पाय घसरला आणि संतुलन बिघडल्याने ते थेट खोल दरीत कोसळले. घटनेची माहिती मिळताच पचमढी पोलीस घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीने अथक प्रयत्नांनंतर दरीतून त्यांचा मृतदेह बाहेर काढला.

सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -९६१०८१० रु.(१०ग्रॅम)
२२.कॅ सोने - ९४,७०० रु.(१०ग्रॅम)
चांदी - १,३०,००० रु. (प्र.किलो)

कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव (क्विंटलमध्ये)

ज्वारी -	१६५० -	२०००
गहू -	२५०० -	३०००
तूर -	६१०० -	६३९०
मूग -	६५०० -	७०००
उडीद -	६००० -	७०००
हरभरा -	५६०० -	५९००
सोयाबिन -	४१०० -	४३५०
बाजरा -	२००० -	२३००
तिळ -	८२०० -	९३००
भुईमूग -	५१५० -	५३५०
मका -	२२०० -	२३००

महापालिकेत बदल्यांचा बंपर धमाका, तब्बल ६९५ कनिष्ठ आणि दुय्यम तसेच सहायक अभियंत्यांच्या बदल्या

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – मुंबई महानगरपालिकेच्या अभियंता संवर्गातील कनिष्ठ अभियंता, दुय्यम अभियंता आणि सहाय्यक अभियंता यांच्या बदल्यांची प्रक्रिया यंदा पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात आली आहे. तब्बल १२ तासांच्या मॅरेथॉन बैठकीनंतर ऑनलाईन बदलीची अंतिम प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. बदल्या करण्यात आल्या असून महापालिकेत प्रथमच ऑनलाईन बदलीची प्रक्रिया राबवण्यात आली असून १५२ कनिष्ठ अभियंता, ४४४ दुय्यम अभियंता आणि ९९ सहाय्यक अभियंता अशा एकूण ६९५ अभियंत्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. महानगरपालिका आयुक्त आश्विनी भिडे यांच्या मान्यतेने आणि अतिरिक्त आयुक्त अविनाश धाकणे यांच्या नेतृत्वाखाली मुंबई महापालिकेतील ३ वर्षांपेक्षा अधिक कालावधी एकाच पदावर असलेल्या अभियंत्यांच्या बदलीचा निर्णय घेतला आहे.

'मार मार मारलं, पाणी मागितलं अन तोंडात...': वैजापूर हत्या प्रकरणाने खळबळ : पालकमंत्र्यांची पीडित कुटुंबीयांना भेट

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



वैजापूर – छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातून एक माणुसकीला कलंक फासणारी घटना समोर आली आहे.

राज्यात वाढत्या गुन्हेगारीच्या घटना ताज्या असतानाच, संतोष देशमुख हत्या प्रकरणाची आठवण करून देणाऱ्या या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र पुन्हा एकदा हादरला आहे. जुन्या वादाच्या रागातून एका तरुणाला अमानुषपणे बेदम मारहाण करण्यात आली.

मारहाणी दरम्यान गंभीर जखमी झालेल्या या तरुणाने पिण्यासाठी पाणी मागितले असता, लघवी केल्याचा संतापजनक आरोप करण्यात आला आहे.

वैजापूरमधील आरोपींनी त्याच्या तोंडात या क्रूर प्रकारामुळे नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत असून, परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. त्यामुळे एवढ्या मोठ्याप्रमाणात बदली करण्याची ही पहिलीच घटना असून दिवाळीतच या बदल्यांचा बंपर धमाका फुटल्याने कुणाची दिवाळी आनंदमय तर कुणाची निराशामय होणार आहे.







